मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ यांना राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) यांचे कडून घ्यावयाच्या कर्जास हमी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक : असंवि-२०११/प्र.क्र.६६/अर्थबळ
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ६ सप्टेंबर, २०११.

वाचा: १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. शासन हमी-१०९९/प्र.क्र.६८/शासन हमी, दि.५.११.१९९९.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-शाहमी १००८/प्र.क्र.१८/शा.हमी, दि.[illegible]
३) शा.नि.रोजगार व स्वयंरोजगार विभाग,क्र.इएसई-२०००/प्र.क्र.४४/रोस्वरो-२, दि.[illegible]
४) शा.नि.रोजगार व स्वयंरोजगार विभाग,क्र.रोस्वरो-२००३/प्र.क्र.१६/[illegible]-२, दि.[illegible]
५) राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एनएमडीएफसी/प्रोजेक्टस्/२०११-१२/२१४८, दि.१६.६.२०११.
६) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ यांचे पत्र क्र.[illegible]/हमी/२०११/१५२०, दिनांक १६.[illegible].११

__प्रस्तावना__ : राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळास राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळाची वाहिनीकृत यंत्रणा म्हणून राज्यात काम करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यास अनुसरुन राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाकडून मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळास [illegible] शासन हमी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता

__शासन निर्णय :__

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळास राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) यांचेकडून उपलब्ध होणाऱ्या रु.३० कोटी (अक्षरी रु.तीस कोटी) इतक्या कमाल मर्यादेपर्यंतच्या कर्जास व त्यावरील व्याजास ठोकहमी देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सदर शासनहमी शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : शासनहमी-१०९९/प्र.क्र.६८/शासनहमी, दिनांक ५.११.१९९९ अन्वये विहित केलेल्या अटींच्या तसेच खाली दर्शविलेल्या अटींच्या अधीन राहील.

२. सदर स्वतंत्र शासन हमीखालील रक्कम रु.३०.०० कोटी आवश्यकतेनुसार उपलब्ध करण्याची मुदत दिनांक ३१ मार्च, २०१३ पर्यंत वैध राहील. महामंडळाने यापुढे वसुलीच्या रकमेतून शासन हमीखालील कर्जाची उचल न करता, दिलेल्या हमी रकमेच्या मर्यादित कर्ज उचल करण्याची कार्यवाही करावी. मर्यादा पूर्ण झाल्यानंतर रकमेत वाढ किंवा मुदतवाढ मागणी करू नये.

३. राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) बरोबर शासन हमीवर देण्यात येणाऱ्या कर्जाबाबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यात खालील अटी व शर्तींचा समावेश करण्यात यावा.

अ) राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) यांच्याकडून ज्या प्रकल्पांना कर्ज [illegible] निवडी [illegible] करणे व लाभार्थी [illegible]

ब) देय व्याज, हमी शुल्क तसेच अधिपरिव्यय (Over head cost) याची पूर्णपणे वसुली होऊ शकेल अशा दराने व्याज आकारणी मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ लाभार्थ्यांना कर्ज वाटप करताना करेल.

क) वरीलप्रमाणे ज्या लाभार्थ्यांना कर्ज देण्यात येते त्या लाभार्थ्यांची पतयोग्यता व योग्य प्रतिभूती यांची छाननी व खात्री करुन घेण्याची एक यंत्रणा मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ कार्यान्वित करेल. त्याचप्रमाणे कर्जफेडीत कसूरी झाल्यास कर्ज मंजूर / शिफारस करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल व त्यांचे यासंदर्भातील अधिकार काढून घेण्यात येतील.

ड) ज्या जिल्हा / क्षेत्रात कर्जफेडीतील वसुलीचे प्रमाण समाधानकारक नसेल, अशा जिल्हा / क्षेत्रामध्ये नव्याने कर्ज मंजूर करता येणार नाही याची खात्री करुन घेण्यासाठी मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाकडून योग्य ती यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल.

इ) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाने प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीस राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) यांच्याकडून उपलब्ध होणाऱ्या कर्जाबाबत आढावा घेऊन त्यासंबंधीच्या वित्तीय मर्यादा महामंडळाने शासनाकडून निश्चित करुन घ्याव्यात.

ई) राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) यांच्याकडून मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ यांना मंजुर करण्यात आलेल्या प्रत्येक कर्जासंबंधीचा स्वतंत्र प्रस्ताव त्याबाबतच्या निविष्टी प्रपत्रासह (Input Proforma) महामंडळाने शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा. त्यानुसार सदर प्रस्तावास शासनस्तरावर मंजुरी प्रदान करण्यात येईल.

फ) राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) यांच्याकडून ज्या प्रकल्पांना कर्ज मंजूरी दिलेली आहे, ते प्रकल्प वर्धनक्षम आहेत याची मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाने खात्री करुन घ्यावी.

भ) लाभार्थ्यांना मंजूर केलेल्या कर्जाची वसूली वेळच्यावेळी परतफेडीच्या वेळापत्रकानुसार मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाने करावी.

म) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) कडून अधिक कर्ज घेणार नाही.

य) **राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) ने मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाला मंजूर केलेल्या कर्जाच्या आदेशामध्ये नमूद केलेल्या परतफेडीच्या वेळापत्रकानुसार कर्जफेडीच्या शेवटच्या हप्त्याच्या दिनांकास हमी संपुष्टात येईल. सदर वेळापत्रकात नमूद केलेल्या विहित कालावधीसाठीच शासन हमी लागू राहील. या कालावधी नंतर राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) ला शासन हमी आवाहनीत करता येणार नाही.**

र) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ यांनी दर तीन महिन्यांनी कर्ज मंजूर झालेल्या प्रकल्पाच्या प्रगतीबाबतची स्थिती दर्शविणारी माहिती अल्पसंख्याक विकास विभाग व वित्त विभागाकडे सादर करावी.

ल) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाने लाभार्थ्यांकडील कर्ज वसुलीचा तसेच वित्तीय दायीत्वाचा अहवाल दर तीन महिन्यांनी अल्पसख्यांक विकास विभाग, वित्त विभागास न चुकता सादर करावा.

व) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाने विहीत कार्यपध्दतीने लेखा परिक्षीत केलेल्या व संस्थेने मान्य केलेल्या संस्थेच्या लेख्यांची एक प्रत प्रत्येक वर्ष संपल्यानंतर चार महिन्याच्या आत शासनास सादर करावी.

५. **हमी शुल्क**

अ) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळास प्र.श.प्र.व. हमीशुल्काचा दर रु.२/- असा राहील. हे हमीशुल्क ज्या कालावधीकरीता देय राहील त्या कालावधीतील कोणत्याही दिवशी कमाल अदत्त असलेल्या कर्ज आणि व्याजाच्या एकूण रकमेवर (total maximum outstanding amount) देय राहील.

ब) हमी शुल्काचा भरणा दर सहा महिन्यांनी वसुली करुन शासनाच्या खाती जमा करण्यास व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ,मुंबई हे जबाबदार असतील. प्रत्येक वित्तीय वर्षाच्या ३१मार्च आणि / अथवा ३० सप्टेंबर, रोजी अदत्त असलेल्या घटना सापेक्ष दायित्वावर (Contingnt Liability) अनुज्ञेय असलेल्या हमी शुल्काचा भरणा १ एप्रिल आणि / अथवा १ ऑक्टोबर रोजी करावा.

क) राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून देय असलेल्या हमीशुल्काचा पहिला हप्ता वसुल करुन शासनास भरेल तद्नंतरच कर्जाचा पहिला हप्ता मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळास वितरीत करेल.

ड) हमी शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यामधून प्रथम थकित हमी शुल्कावरील दंडनीय व्याजाची रक्कम वळती करुन घेण्यात येईल. नंतर सर्वात जुन्या थकित हमी शुल्काची वसुली त्यानंतर त्यापेक्षा कमी जुन्या थकित हमी शुल्काची वसुली याप्रमाणे रक्कम वळती करुन घेण्यात येईल.

इ) देय हमी शुल्क शासन तिजोरीत भरणा करण्यास महामंडळाकडून कसूर झाल्यास अशा कसूर केलेल्या थकीत रक्कमेवर पहिल्या तीन महिन्यासाठी १६ टक्के दराने व त्या पुढील कालावधीसाठी २४ टक्के दराने व्याज आकारले जाईल.

ई) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाने शासन हमी शुल्काची रक्कम "००७५-संकीर्ण, सर्वसाधारण सेवा-१०८-हमी शुल्क" या लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करावी. व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ,मुंबई यांनी महामंडळाकडून देय असलेली हमी शुल्काची रक्कम शासकीय कोषागारात नियमितपणे भरणा केली जाते याची खात्री करुन घ्यावी.

प) हमी शुल्क भरल्याच्या पृष्ठयर्थ चलनाची सांक्षाकित प्रत अल्पसंख्यांक विकास विभागाने वित्त विभागास साक्षेपाने पाठवावी.

फ) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाने देय हमीशुल्काचा भरणा केला नाही तर सदर हमीशुल्क राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) शासनाकडे भरणा करेल व महामंडळाकडून वसूल करेल.

६. हा शासन निर्णय अल्पसख्यांक विकास विभाग, कार्यासन-८ यांच्या नस्ती क्र.मौआम-२०११/ प्र.क्र.१०३/का-८ वरील प्रस्ताव व वित्त विभागाचा शासन हमी क्रमांक- ८/२०११-१२ यानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) समवेत कर्ज घेण्यासंबंधी करावयाच्या करार पत्रावर स्वाक्षरी करण्याकरिता अल्पसंख्याक विकास विभागातील संबंधित सह सचिव/उप सचिव व वित्त विभागातील उप सचिव (अर्थबळ) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक **२०११०९०६११३२०५०००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(मोनल पेंडणेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) राज्यपालाचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई.
५) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
६) महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
७) महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानभवन सचिवालय, मुंबई, (५प्रती)
९) बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा इटमेंट, आझाद मैदान, मुंबई,
१०) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरेक्स क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईन्ट, मुंबई-२०,
११) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राज भुवन, एस.व्ही.पटेल रोड,मुंबई-४०० ००४.
१२) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी) महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३.
१३) इंडियन नॅशनल कॉग्रेस पार्टी, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस (आय) समिती, टिळक भवन,काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५,
१४) नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईन्ट, मुंबई-४०० ०२१,
१५) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८.
१६) अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१७) व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, १ ला मजला, कोर-१, स्कोप मीनार, लक्ष्मीनगर, नवी दिल्ली ११० ०९२
१८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२०) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२१) व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, डी.डी. बिल्डिंग, २ रा मजला, जुने जकातघर, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई ४०० ०२३
२२) वित्त विभाग (साउ /ऋण व हमी सनियंत्रण कक्ष/व्यय-४) मंत्रालय, मुंबई ३२
२३) कक्ष अधिकारी (का-८) अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई ३२
२४) निवड नस्ती /अर्थबळ.